# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

**Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ९२-२३** **दिनांक :- २१/०३/२०२३**

## मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालयाचे वतीने पोलीस भरती प्रक्रिया २०२१ करीता पात्र पोलीस शिपाई चालक उमेदवारांसाठी लेखी परिक्षेचे आयोजन.

मिरा- भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर सुरु असलेल्या पोलीस शिपाई-चालक पदाच्या पक्रियेमध्ये शारीरिक चाचणी व कौशल्य चाचणीमधुन लेखी परिक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी यापुर्वी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर उमेदवारांची लेखी परिक्षा दिनांक २६/०३/२०२३ रोजी सकाळी ०८:३० ते १०:०० वाजेच्या दरम्यान **मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्त कार्यालय, २ रा माळा, संवाद हॉल, राष्ट्रसंत आचार्य श्री. पद्मसागर सुरश्वरजी भवन, सेक्टर ५, मिरारोड पूर्व ठाणे ४०११०७** या ठिकाणी घेण्यात येणार आहे. लेखी परिक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र हे महाआयटी विभागामार्फत ऑनलाईन पद्धतीने डाउनलोड करण्यास उपलब्ध अहे.

सर्व **पोलीस शिपाई-चालक लेखी** परिक्षेसाठी पात्र असलेल्या उमेदवारांनी **रविवार दिनांक २६/०३/२०२३ रोजी सकाळी ठिक ०६:३० वाजता** उपरोक्त ठिकाणी लेखी परिक्षेसाठी हजर रहावे.

## -:उमेदवारांसाठी खालीलप्रमाणे सुचना:-

- सर्व उमेदवारांनी वेळेमध्ये वर नमुद ठिकाणी हजर राहणे बंधनकारक आहे. परिक्षा सुरु झाल्यानंतर आलेल्या उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत प्रवेश दिला जाणार नाही.
- उमेदवारांनी परिक्षेसाठी येताना महाआयटीकडुन यापुर्वी देण्यात आलेले प्रवेशपत्र सोबत आणणे बंधनकारक आहे. लेखी परिक्षेसाठी दिलेले ओळखपत्राशिवाय उमेदवारास परिक्षासाठी प्रवेश देण्यात येणार नाही. महाआयटीकडुन ओळखपत्र प्राप्त न झाल्यास मुदतीत या कार्यालयास संपर्क करावा.
- उमेदवारांना पॅड व काळया शाईचे पेन परिक्षेवेळी या कार्यालयाकडून पुरविले जाणार असल्याने मुद्दा क्रमांक २ मधील कागदपत्रांव्यतिरीक्त इतर कोणतेही साहित्य परिक्षा केंद्रावर आणण्यास मनाई आहे.
- उमेदवारांनी मोबाईल, स्मार्ट वॉच, गणकयंत्र इतर कोणतेही ब्लुटुथ यंत्र जवळ बाळगण्यास सक्त मनाई आहे. तसे निदर्शनास आल्यास अथवा उमेदवार इतर कोणत्याही बेकायदेशीर मार्गाचा अवलंब

करत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याचेवर कायदेशीर कारवाई केली जाईल व सबंधित उमेदवारास पुढील पोलीस भरती प्रक्रियेतुन तात्काळ बाद करण्यात येईल.

सदरची पोलीस शिपाई चालक भरती लेखी परिक्षा पारदर्शकपणे पार पाडण्याकरीता सर्व स्तरावर विशेष उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

-----ooo-----